ePaper

# राहुल गांधींना सावरकरांविरुद्ध वक्तव्य पडलं महागात



| वर्ष - 6 | अंक - 215 | UDYAM-MH-26-0158827 |

महाईन्यूज (TM)

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## आतील पानांत


- ऑन डिमांड चोरायचा दुचाकी; आतापर्यंत २० हून अधिक गाड्या जप्त
- जय गणेश साम्राज्य चौक घेणार 'मोकळा श्वास'
- एपीएमसी फळ बाजारात अग्नितांडव


www.mahaenews.com | शुक्रवार | दिनांक 18 नोव्हेंबर 2022 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

# दिव्या खाली अंधार!

## स्वच्छ सर्वेक्षणावर लाखोंची उधळपट्टी : निगडी स्मशानभूमीतील शौचालय बंद

**|पिंपरी-चिंचवड | |महाईन्यूज |प्रतिनिधी|**

**निगडी अमरधाम स्मशानभूमीतील शौचालयाची दुरावस्था झाल्याने हे शौचालय तब्बल दोन वर्षापासून बंद आहे. प्रशासनाच्या वतीने नवीन शौचालय बांधण्याच्या कामास सुरुवात करण्यात आली होती. परंतू या कामास पाच महिन्यांचा कालावधी उलटून देखील महापालिकेने नेमलेल्या ठेकेदाराकडून अद्यापही काम पूर्ण करण्यात आलेले नाही. अत्यंत संथ गतीने चाललेल्या शौचालयाच्या बांधकामामुळे तेथे अंत्यविधीसाठी येणाऱ्या नागरिकांना गैरसोयींचा सामना करावा लागत आहे.**



**त्यामुळे या तक्रारीची दखल घेऊन शौचालयाचे काम तात्काळ सुरू करण्यात यावे, अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते दिपक खैरनार यांनी केली आहे.**

या संदर्भात आयुक्तांना दिलेल्या तक्रार अर्जात खैरनार यांनी म्हटले आहे की, निगडी अमरधाम स्मशानभूमीमधील सार्वजनिक शौचालयाला बांधून तब्बल तीस वर्षे झालेली आहेत. हे शौचालय अत्यंत जीर्ण झाले असून त्यातील भिंतींना मोठ-मोठे तडे गेल्याने शौचालय कोणत्याही क्षणी ढासळण्याची शक्यता नाकारता येत नाही. या संदर्भात अनेक वेळा तक्रारी केल्या नंतर पाच महिन्यापूर्वी प्रशासनाकडून नवीन शौचालय बांधण्याच्या कामास सुरुवात करण्यात आली. परंतू अद्याप पर्यंत सदरील शौचालयाचे काम पूर्ण करण्यात आलेले नाही. केवळ तिनशे स्क्वेअर फुट इतक्या जागेत चालू असणा-या शौचालयाचे काम एवढ्या कालावधीत पूर्ण व्हायला हवे होते. परंतू आत्तापर्यंत फक्त शौचालयाच्या पाया पर्यंतचे (प्लिंथ लेव्हल) काम झाले आहे. त्यामुळे सदर काम हे अत्यंत धीम्या गतीने चालू असल्याचे दिसून येत आहे.

महापालिकेकडून स्वच्छ सर्वेक्षणाच्या नावाखाली शहरभर फक्त जाहिराती व रंगरंगोटीवर वारेमाप पैसा खर्च केला जातो. त्यामुळे स्वच्छ सर्वेक्षणावर लाखोंची उधळपट्टी करणाऱ्या पिंपरी चिंचवड महापालिकेचा कारभार म्हणजे 'दिव्या खाली अंधार' असाच आहे. स्मशानभूमीत अंत्यविधीसाठी येणारे वृद्ध नागरिक, दिव्यांग व्यक्ती, महिला वर्ग, तसेच नागरिकांना यामुळे मोठ्या अडचणीचा सामना करावा लागत आहे. परंतू याचे गांभीर्य लोकप्रतिनिधी, संबंधित अधिकारीवर्ग तसेच ठेकेदाराला नसल्याचे दिसून येत आहे.

> महापालिका प्रशासनाकडे या संदर्भात अनेक वेळा तक्रारी करून देखील ठेकेदार त्याच्या सोयीनुसार हे काम करीत आहे. ठेकेदारावर प्रशासनाचा वचक राहिलेला नाही. त्यामूळे स्वतः आयुक्तांनी यात लक्ष घालून शौचालयाचे काम तात्काळ पुर्ण करण्या संदर्भात संबंधित यंत्रणेला आदेश द्यावेत, अन्यथा नाईलाजास्तव तीव्र आंदोलन छेडण्यात येईल.
>
> **- दिपक खैरनार,** सामाजिक कार्यकर्ते.

# "इको- सेन्सिटिव्ह" झोनला विरोध नाही पण...

## खासदार श्रीरंग बारणे यांची मागणी : सर्वसामान्य शेतकरी, ग्रामस्थांना त्रास नको

**|पिंपरी-चिंचवड | |महाईन्यूज |प्रतिनिधी|**

पुणे जिल्ह्यातील मावळ, मुळशी-भोर-वेल्हा या भागातील मोठे क्षेत्र 'इको-सेन्सिटिव्ह' झोन करण्याबाबत हालचाली सुरु आहेत. 'इको-सेन्सिटिव्ह' झोन करण्यास विरोध नाही. पण, घरे, शेतीक्षेत्र, धरण परिसरातील गावांचा त्यात समाविष्ट करु नये, अशी महत्वपूर्ण मागणी मावळचे खासदार श्रीरंग बारणे यांनी राज्याच्या वनविभागाकडे केली.

पश्चिम घाट पर्यावरण संवेदनशिल ('इको-सेन्सिटिव्ह') झोन वाढविण्याबाबत केंद्रीय वन व पर्यावरण मंत्रालयाने 'इको-सेन्सिटिव्ह'बाबत राज्य सरकारकडून अहवाल मागविला आहे. त्यामुळे मावळचे खासदार श्रीरंग बारणे यांनी तातडीने राज्याचे वनमंत्री सुधीर मुनगंटीवार यांची भेट घेतली. त्यांच्यासोबत सविस्तर चर्चा केली. 'इको-सेन्सिटिव्हबाबत सकारात्मक निर्णय घेण्याची मागणी निवेदनाद्वारे केली.

याबाबत खासदार श्रीरंग बारणे म्हणाले, पश्चिम घाटातील काही भागात पर्यावरण संवेदनशिल ('इको-सेन्सिटिव्ह') झोन आहे. त्याचे कार्यक्षेत्र वाढविण्यात येणार आहे. केंद्रीय वन व पर्यावरण मंत्रालयाने 'इको-सेन्सिटिव्ह'बाबत राज्य सरकारकडून अहवाल मागविला आहे. माझ्या मावळ लोकसभा मतदारसंघातील कर्जत, खालापूरमधील काही भाग पूर्वीच 'इको-



सेन्सिटिव्ह' झोन आहे. त्याचा शेतक-यांना मोठा फटका बसतो. शेतक-यांना घरे बांधता येत नाही. कोणताही विकास करता येत नाही. 'इको-सेन्सिटिव्ह' झोन शेतक-यांसाठी त्रासदायक ठरत आहेत.

त्यातच आता पुणे जिल्ह्यातील मावळ, मुळशी-भोर-वेल्हा या भागातील 'इको-सेन्सिटिव्ह' क्षेत्रात वाढ करण्याबाबत हालचाली सुरु आहेत. 'इको-सेन्सिटिव्ह' झोन करण्यास विरोध नाही. पण, डोंगर माथ्यावर असलेल्या झाडीवर वनजीवन सुरक्षा कायद्याअंतर्गत करण्यास काहीच हरकत नाही. परंतु, ज्या भागात शेती केली जाते. नागरिकांची घरे आहेत. धरण क्षेत्र, त्याला लागून असलेल्या जमिनीच्या भागात 'इको-सेन्सिटिव्ह' झोन केला. तर, त्याचा शेतक-यांना त्याचा मोठा फटका बसेल.

> शेतक-यांना मोठे परिणाम भोगावे लागतील. त्यासाठी नागरिकांची घरे, शेतीक्षेत्रात 'इको-सेन्सिटिव्ह' झोन करु नये. 'इको-सेन्सिटिव्ह' वगळणे राज्य सरकारच्या कार्यक्षेत्रात येत नाहीत. त्यासाठी थेट केंद्र सरकारकडे जावे लागते. शेतकरी केंद्राच्या पर्यावरण विभागाकडे जावू शकत नाहीत. त्यासाठी राज्य शासनाने 'इको-सेन्सिटिव्ह' झोन वाढविण्यापूर्वीच सकारात्मक विचार करावा.
>
> **- श्रीरंग बारणे, खासदार.**

> 'इको-सेन्सिटिव्ह' झोन निश्चित करताना सकारात्मक निर्णय घेतला जाईल. महाराष्ट्रातील ज्या लोकप्रतिनीधींचा भाग यामध्ये येत आहे. त्या लोकप्रतिनिधींची केंद्रीय पर्यावरण मंत्री भूपेंद्र यादव यांच्यासोबत एक बैठक घेतली जाईल. लोकप्रतिनीधींसोबत सकारात्मक चर्चा करुनच 'इको-सेन्सिटिव्ह' झोन वाढविण्याबाबतचा अहवाल केंद्र सरकारला पाठविला जाईल ".
>
> **- सुधीर मुनगंटीवार, वनमंत्री.**

# ऑन डिमांड चोरायचा दुचाकी; आतापर्यंत 20 हून अधिक गाड्या जप्त

## 10 लाख रुपयांहून अधिक किंमतीची गाड्या चोरी करणारा अट्टल गुन्हेगाराला पोलिसांनी बेड्या ठोकल्या

**पुणे । महाईन्यूज ।**

**सोलापूर मधून आलेल्या मागणीनुसार पुण्यात गाड्या चोरणारा चोर पोलिसांच्या जाळ्यात सापडला आहे. पुण्यातील हडपसर परिसरात १० लाख रुपयांहून अधिक किंमतीची गाड्या चोरी करणारा अट्टल गुन्हेगाराला पोलिसांनी बेड्या ठोकल्या आहेत.**



या प्रकरणात अटक केलेल्या आरोपीचे नाव अजय झेंडे (३२) असे नाव असून त्याच्याकडून आत्तापर्यंत २० हून अधिक दुचाकी गाड्या जप्त करण्यात आल्या आहेत.


पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, अजय झेंडे हा मूळचा दौंडचा असून पुण्यात तो किरकोळ कामे करायचा. पुण्यातील दुचाकी चोरून नंबर प्लेट बदलून तो त्याचा सोलापूर येथील मित्र यल्लाप्पा बेल्ले (३४) याला विकत असे. बेल्ले मागणीनुसार, झेंडे ला गाडी चोरण्यासाठी सांगायचा. कधी एका विशिष्ट कंपनीची गाडी हवी असेल तर बेल्ले हा झेंडेला ती हवीय असे सांगून संशय येऊ नये म्हणून शहराच्या बाहेरील भागातून गाडी चोर असे आदेश द्यायचा. झेंडे या गाड्या चोरून सोलापूरला नेऊन बेल्लेकडे सोपवत असे.

दौंड पोलिस ठाण्यात या आधी झेंडे वर एटीएम फोडण्याच्या प्रयत्न केल्याप्रकरणी गुन्हा दाखल आहे. पुणे पोलिसांच्या गुन्हे शाखेच्या युनिट ५ नी ही कारवाई केली असून पुढील तपास सुरू आहे.

# ‘भारत जोडो’ यात्रेसाठी पुण्यातून काँग्रेसचे एक हजार कार्यकर्ते बुलढाण्याला रवाना

**पुणे । महाईन्यूज ।**

हरातील एक हजार पदाधिकारी आणि कार्यकर्ते बुलढाणा जिल्ह्याकडे गुरुवारी रवाना झाले. पुणे शहर आणि जिल्ह्यातील ऐतिहासिक आणि स्वातंत्र लढ्याशी संबंधित शक्तीस्थळावरून संकलित केलेली माती आणि बोधीवृक्ष यावेळी पदाधिकाऱ्यांकडून राहुल गांधी यांना देण्यात येणार आहे.



राहुल गांधी यांच्या भारत जोडो यात्रेसाठी बुलढाणा जिल्ह्यामध्ये पुणे शहर काँग्रेसचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते या यात्रेत सहभागी होणार आहेत. राहुलजी गांधी हे देशातील धर्मभेद, जातीभेद व तिरस्कार मिटविण्यासाठी भारत जोडो यात्रा करीत आहेत. भारतीय जनता पक्षाने गेल्या आठ वर्षांत देश तोडण्याचे राजकारण केले आहे. त्याविरोधात ही यात्रा काढण्यात आली असल्याचे काँग्रेसचे प्रभारी शहराध्यक्ष अरविंद शिंदे यांनी सांगितले. माजी नगरसेवक अजित दरेकर, रफिक शेख, संगीता तिवारी, सुजित यादव, राजेंद्र भुतडा, द. स. पोळेकर, उमेश कंधारे, संदीप मोकाटे, चैतन्य पुरंदरे यांच्यासह अन्य पदाधिकारी उपस्थित होते.

# बदला घेतल्याची भाषा अयोग्य

## सुप्रिया सुळे यांची फडणवीस यांच्यावर टीका

**पुणे । महाईन्यूज ।**

राज्याच्या राजकारण जे सुरू आहे ते दुर्देवी आहे. विरोधक हा वैचारिक विरोध करतो, बदल्याची भाषा त्यात नसते. बदला घेतल्याची भाषा पहिल्यांदा ऐकली, हे अतिशय दुदैवी आहे, अशा शब्दात खासदार सुप्रिया सुळे यांनी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर टीका केली.

उद्धव ठाकरे यांचा बदला घेतल्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काही दिवसांपूर्वी जाहीर केले होते. या पार्श्वभूमीवर बारामती येथे पत्रकारांशी



बोलताना सुप्रिया सुळे यांनी फडणवीस यांच्यावर टीका केली. राज्यात सध्या जे काही सुरू आहे ते अस्वस्थ करणारे आहे, असेही सुळे यांनी स्पष्ट केले.

सुळे म्हणाल्या, की यापूर्वीही राजकीय कटुता होती. पण सध्या जे सुरू आहे ते मला अस्वस्थ करणारे आहे. अनिल देशमुख, नवाब मलिक, संजय राऊत यांच्याबाबत जो काही प्रकार सुरू आहे तो अस्वस्थ करणारा आहे. ज्या संस्कृतीत मी वाढले, ती ही संस्कृती नाही. यशवंतराव चव्हाण यांच्या विचारांचा वारसा आपण जपतो आणि जपायला हवा. ज्येष्ठ नेत्यांच्या तोंडी बदल्याची भाषा अयोग्य आहे. खासदार संजय राऊत यांनी शिवसेनाप्रमुख स्व. बाळासाहेब ठाकरे यांना भारतरत्न पुरस्कार द्यावा, अशी मागणी केली आहे. या मागणीला राष्ट्रवादी काँग्रेसचा पाठिंबा आहे. विरोधकांकडे बोलण्यासाठी सध्या काही उरले नाही.

# लावणीला राजाश्रयाबरोबरच लोकाश्रयही मिळाला पाहिजे - खासदार श्रीनिवास पाटील

**हडपसर। महाईन्यूज ।**

लावणी ही चोरून बघण्याची कला नाही आणि डोळे फाडून बघण्याचीही नाही. तो एक विकार आहे. हा विकार घेऊन ही कला पाहिली तर ती टिकणार नाही. लावणी ही एकच अशी कला आहे ज्यामध्ये सगळं झाकलं जातं, लपलं आणि मातलंही काहीच जात नाही. तीला राजाश्रयाबरोबरच लोकाश्रयही मिळाला पाहिजे. ही जबाबदारी रसिक प्रेक्षकांची आहे,' असे मत खासदार श्रीनिवास पाटील यांनी व्यक्त केले.

येथील पठ्ठे बापूराव प्रतिष्ठान व सांस्कृतिक कला मंडळाच्या वतीने लोककला क्षेत्रासाठी योगदान देत असलेल्या जेष्ठ लोकनाटय़ कलावंत अमन तांबे पुणेकर यांना राज्यस्तरीय ‘शाहीर पठ्ठे बापूराव,’ लावणी नृत्यांगणा रूपा बारामतीकर यांना लोकसाहित्यिक ‘डॉ. भास्करराव खांडगे’ तर, प्रसिध्द ढोलकीपटू गोविंद कुडाळकर यांना पठ्ठे बापूराव यांचे पट्टशिष्य ‘बापूसाहेब जिंतीकर पुरस्कार’ देऊन गौरविण्यात आले. त्यावेळी ते बोलत होते. शाहीर पठ्ठे बापूराव पुरस्कार २१ हजार रुपये, डॉ. भास्करराव खांडगे पुरस्कार १५ हजार रुपये आणि बापूसाहेब जिंतीकर पुरस्कार ११ हजार रुपये, स्मृतिचिन्ह, शाल व श्रीफळ असे



पुरस्काराचे स्वरूप होते. वानवडी येथील महात्मा फुले सांस्कृतिक भवनात हा कार्यक्रम झाला.

जेष्ठ सिने अभिनेत्री लीला गांधी, माजी नगरसेवक मारुती तुपे, बंडू गायकवाड, साधना बँकेचे संचालक सुरेश घुले, महादेव कांचन, अविनाश तुपे, स्मिता गायकवाड, दिपाली कवडे, दिलीप गायकवाड, विकास गायकवाड, अशोक आव्हाळे आदी यावेळी उपस्थित होते.

यावेळी आयोजित लावणी महोत्सवात रेश्मा वर्षा परितेकर पार्टी, शाहीर सगनभाऊ ग्रुप जेजुरी, आर्यभूषण थिएटर ग्रुप पुणे, कविता बंड निर्मित ढोलकीचा खनखनाट, पुष्पराज कलाकेंद्र जेजुरी, अशा संगीत पार्टीच्या कलावंतांनी आपली कला व आदाकारी सादर केल्या.

प्रतिष्ठानचे संस्थापक जयप्रकाश वाघमारे, कार्याध्यक्ष सत्यजित खांडगे, अध्यक्ष देविदास पाटील, मित्रावरुण झांबरे, डॉ. शंतनु जगदाळे, रेश्मा परितेकर, रामदास खोमणे, संदीप घुले, बापू जगताप, आकाश वाकचौरे यांनी संयोजन केले.

शाहीर पठ्ठे बापूराव पुरस्काराने यापूर्वी शकुंतला नगरकर, छाया खुटेगावकर, संजीवनी मुळे, रघुवीर खेडकर, सरस्वतीबाई कोल्हापूरकर अशा जुन्या पिढीतील नामवंत कलावंताना सन्मानित करण्यात आले आहे. दीपक वाघमारे यांनी सूत्रसंचालन केले.

### चऱ्होलीकडे जाणाऱ्या रस्त्याच्या रुंदीकरणाला गती

# जय गणेश साम्राज्य चौक घेणार 'मोकळा श्वास'!

## आमदार महेश लांडगे, महापालिका प्रशासन सकारात्मक

**पिंपरी-चिंचवड ।। महाईन्यूज । प्रतिनिधी।**

**पुणे- नाशिक महामार्गावरील अत्यंत वर्दळीचा असलेल्या जय गणेश सम्राज्य चौकातील वाहतूक कोंडी सोडवण्यासाठी महापालिका प्रशासनाने पुढाकार घेतला असून, चऱ्होलीकडे जाणाऱ्या रस्त्याच्या रुंदीकरणाचे काम लवकरच हाती घेण्यात येणार आहे. त्यामुळे सर्वसामान्य वाहनचालक आणि नागरिकांची या ठिकाणी होणाऱ्या 'कोंडी'तून मुक्तता होणार आहे.**

**भारतीय जनता पार्टीचे शहराध्यक्ष व आमदार महेश लांडगे यांनी याबाबत पाठपुरावा सुरू केला असून, विकास आराखड्यातील मंजुरीप्रमाणे रस्त्याचे काम हाती घेण्यात यावे, अशी सूचना प्रशासन आणि प्रशासक तथा आयुक्त शेखर सिंह यांनी यांना केली आहे. याला प्रशासनाने सकारात्मक प्रतिसाद दिला असून, नागरिकांना लवकरच दिलासा मिळणार आहे.**







पुणे-नाशिक महामार्गावरील वाहतूक कोंडीचा ताण जय गणेश साम्राज्य चौकात मोठ्या प्रमाणात जाणवतो. स्पाईन रोडहून चऱ्होलीकडे जाणाऱ्या वाहनांची संख्याही प्रचंड आहे. मात्र, चौकातून चऱ्होलीकडे जाणारा रस्ता अरुंद असल्यामुळे चौकातील वाहतूक कोंडी होते. या ठिकाणी सिग्नल लागल्यास चाकण आणि भोसरी अशा दोन्ही बाजुच्या दिशने किमान एक-दीड किलोमीटर वाहनांच्या रांगा लागतात. 'पीक अवर'मध्ये वाहनचालक, नागरिकांना नाहक मनःस्ताप सहन करावा लागतो. या पार्श्वभूमीवर पिंपरी-चिंचवड महापालिका प्रशासनाच्या माध्यमातून चऱ्होलीकडे जाणाऱ्या रस्त्याचे विकास आराखड्यातील मंजुरीप्रमाणे रुंदीकरण करण्यात येणार आहे. 'डीपी'नुसार हा रस्ता ४५ मीटर असून, सध्यस्थितीला केवळ ६ मीटर इतका उपलब्ध आहे.

प्रशासनाला १८ मीटर रस्त्यापर्यंत भूसंपादन करण्यात यश मिळाले असून, तुर्तास पहिल्या टप्प्यामध्ये १८ मीटर रस्त्याचे काम प्राधान्यक्रमाने सुरू करण्याची तयारी प्रशासनाने दर्शवली आहे.

महापालिका सह शहर अभियंता प्रमोद ओंबासे म्हणाले की, नगर रचना विभागाने स्पाईन रोडहून चऱ्होलीकडे जाणाऱ्या रस्त्याचे १८ मीटर रुंदीकरण करण्याबाबत सीमांकन केले आहे. त्याची पूर्तता बीआरटी विभागाकडे केल्यास आयुक्तांच्या मान्यतेने सदर काम सुरू करण्यात येईल. त्यामुळे जय गणेश सम्राज्य चौकातील वाहतूक कोंडी कमी करण्यास मदत होणार आहे.

> **स्पाईन रोडहून चऱ्होलीकडे जाणारा रस्ता 'डीपी' मध्ये ४५ मीटर आहे. मात्र, प्रशासनाकडे अद्याप १८ मीटरपर्यंत जागेचा ताबा आहे. सध्यस्थितीला सदर रस्ता केवळ ६ मीटर असून, अरुंद रस्ता आणि वाहनांची मोठी संख्या यामुळे जय गणेश साम्राज्य चौकात कोंडी होत आहे. त्यामुळे उपलब्ध भूसंपादनाप्रमाणे १८ मीटरपर्यंत रुंदीच्या रस्त्यांचे काम मार्गी लागल्यास वाहतूक कोंडी कमी होणार आहे. त्यादृष्टीने प्रशासनाला कार्यवाहीच्या सूचना दिल्या आहेत.**
>
> **- महेश लांडगे,**
> शहराध्यक्ष तथा आमदार, भाजपा, पिंपरी-चिंचवड.

---

### राज्य सरकारकडून 45 औद्योगिक संस्थांशी सामंजस्य करार

# शिंदे-फडणवीस सरकारमुळे रोजगार निर्मितीला चालना : आमदार महेश लांडगे

## वेगवेगळ्या क्षेत्रात 1 लाख 21 हजार रोजगार निर्मिती

**पिंपरी। । महाईन्यूज । प्रतिनिधी।**

**राज्यात वेगवेगळ्या क्षेत्रात १ लाख २१ हजार रोजगार निर्मितीसाठी राज्य सरकारने ४५ औद्योगिक संस्थांशी सामंजस्य करार केले आहेत. जनतेच्या हिताचे निर्णय घेणाऱ्या मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सरकारचे भारतीय जनता पार्टी अभिनंदन करीत आहे, अशी प्रतिक्रिया भाजपा शहराध्यक्ष तथा आमदार महेश लांडगे यांनी व्यक्त केली आहे.**



आमदार लांडगे म्हणाले की, शिंदे - फडणवीस सरकारने राज्यातील युवक - युवतींना रोजगार उपलब्ध व्हावा यासाठी राज्यातील उद्योजक, औद्योगिक संस्थांशी सामंजस्य करार केले आहेत. या करारांमुळे १ लाख २१ हजार रोजगार निर्माण होतील. महाविकास आघाडी सरकारच्या नाकर्तेपणामुळे राज्यात नवी गुंतवणूक येत नव्हती. आता शिंदे फडणवीस सरकारने कार्यक्षम सरकारचा अनुभव देत जनतेच्या हिताचे निर्णय घेण्याचा धडाका लावला आहे.

राज्यात भविष्यकाळात मोठी औद्योगिक गुंतवणूक होण्यासाठी शिंदे - फडणवीस सरकार सातत्याने प्रयत्नशील आहे.

केंद्रातील मोदी सरकारही महाराष्ट्रात नव्या प्रकल्पांसाठी सहकार्य करीत आहे. त्याचा परिणाम आगामी काळात दिसणार असून नव्या प्रकल्पांच्या माध्यमातूनही मोठी रोजगार निर्मिती होईल , असेही आमदार लांडगे यांनी म्हटले आहे.

### एसटी कामगारांनाही दिलासा...

**एसटी कामगारांचा महागाई भत्ता ३४ टक्के करण्याचा निर्णय घेतल्याबद्दलही आमदार लांडगे यांनी शिंदे - फडणवीस सरकारचे अभिनंदन केले आहे. उद्धव ठाकरे मुख्यमंत्री असताना एसटी कर्मचाऱ्यांच्या वेतनासाठी राज्य सरकारने पैसे दिले नव्हते. पगार होत नसल्याने अनेक एसटी कर्मचाऱ्यांनी आत्महत्या केल्या होत्या. शिंदे फडणवीस सरकारने राज्य सरकारी कर्मचाऱ्यांप्रमाणे एसटी कर्मचाऱ्यांनाही ३४ टक्के महागाई भत्ता देण्याचा निर्णय घेतला आहे, असे त्यांनी सांगितले.**

> **या करारांमुळे १ लाख २१ हजार रोजगार निर्माण होतील. महाविकास आघाडी सरकारच्या नाकर्तेपणामुळे राज्यात नवी गुंतवणूक येत नव्हती. आता शिंदे फडणवीस सरकारने कार्यक्षम सरकारचा अनुभव देत जनतेच्या हिताचे निर्णय घेण्याचा धडाका लावला आहे.**

## संपादकीय »

# जीर्ण शाल मग उरे शेवटी..

***पुरेसे वृद्धाश्रम नाहीत, तरुणांचे प्रचंड स्थलांतर, आदी समस्या आज चाळिशी-पन्नाशीत असलेल्यांना भेडसावतील; त्यांच्यासाठी तर आतापासून धोरणात्मक उपाय होणे आवश्यक..***

या तीन घटना एकमेकांशी थेट संबंधित नसल्या तरी त्यांचा एकमेकांशी संबंध आहे. इजिप्तमध्ये सुरू असलेली पर्यावरणविषयक परिषद, अमेरिकेत गेल्या काही वर्षांत भारतीय विद्यार्थ्यांच्या प्रमाणात थेट १९ टक्क्यांनी झालेली मोठी वाढ आणि त्याच वेळी जगाची लोकसंख्या ८०० कोटी इतकी होत असल्याचे वृत्त. या मुद्द्यांच्या त्रिकोणातून वास्तवाचा आढावा घेतल्यास यातील शेवटच्या मुद्द्याचे गांभीर्य ध्यानात यायला मदत होईल. यास आणखी एक उपकथानक आहे. ते अर्थातच भारताचे. ते असे की जगाची लोकसंख्या ८०० कोटींचा टप्पा ओलांडून पुढे जात असताना यंदाच्या जुलैनंतर अशी परिस्थिती येईल की त्या वेळी भारत हा जगातील सर्वाधिक लोकसंख्येचा देश ठरेल. म्हणजे निदान या मुद्द्यावर तरी आपण चीन या देशास मागे टाकू. याचाच दुसराही अर्थ असा की सध्या जगातील दर सहा मानवी सजीवांमधील एक हा भारतीय असतो; ते प्रमाण वाढू शकेल. म्हणजे दर पाच-साडेपाच जिवंत इसमांतील एक यापुढे भारतीय असेल. अशा तऱ्हेने जगात भारतीयांचा सुळसुळाट होईल. त्यामुळे तरी निदान जगाच्या पाठीवर कोणा भारतीयाचे काही भले झाले की लगेच येथे 'हा आपला, हा आपला' असे म्हणत त्या यशास लोंबकळणाऱ्यांचे प्रमाण कमी होईल ही आशा. इतकी सुद्दढ सणसणीत पैदास असेल तर सांख्यिकी सरासरीच्या न्यायाने भारतीयांच्या पदरात बरेच ठिकाणी बरेच काही पडणारच. तेव्हा यापुढे 'भारत वंशीयांच्या' यशाचे कौतुक कमी व्हायला हरकत नाही. असो. आता याच्याशी संबंधित तीन अन्य मुद्द्यांविषयी.

तज्ज्ञांच्या हवाल्याने मंगळवारी प्रसृत झालेल्या तपशिलानुसार ८०० कोटी या संख्येवर जनसंख्या काही काळ स्थिर राहील आणि शक्यता ही की तीत नंतर घट होईल. या ८०० कोटी सत्याबाबत धक्कादायक बाब अशी की अवघ्या दशकभरापूर्वी, म्हणजे २०११ च्या अखेरीस, या जगात ७०० कोटी जन नांदत होते. म्हणजे तेथपासून आतापर्यंत थेट १०० कोटींची यात भर पडली. हा वेग धक्कादायक म्हणायचा. त्यातही पहिल्या १०० कोटींस जन्मास घालेपर्यंत सहस्र वर्षे गेली. पण नंतरच्या फक्त २०० वर्षांत आपण ७०० कोटींस प्रसवले. या संदर्भातले भाकीत असे की हा 'वेग' आपण असाच राखला तर साधारण १०५० कोटी जनसंख्येवर जगाची लोकसंख्या स्थिर होईल आणि नंतर तीत घट होऊ लागेल. तसेच पुढील काही दशकांत अफ्रिका खंड हा सर्वाधिक लोकांस सामावून घेणारा भूप्रदेश असेल.

# जर्नल्सचे क्लोन रिसर्च !






पन्नाशीच्या दशकात विज्ञानाने दिलेल्या झेरोग्राफी तंत्रज्ञांनाने मूळ लेखाची हुबेहूब छायाप्रत करता येऊ लागली. त्यानंतर चार दशकांनी स्कॉटलंड येथील रोझलीन संस्थेतील संशोधकांनी क्लोनिंग तंत्रज्ञानाने एका सजीवासारखा दुसरा सजीव (प्रतिकृती) बनविण्यात यश मिळवले; आणि हे सर्वज्ञात झाले ते 'डॉली' मेंढीमुळे. अथक परिश्रमाने प्रयोगशाळेत तयार केलेली 'डॉली' म्हणजे मानवी संशोधनाचा एक करिश्माच.

झेरोग्राफी किंवा क्लोनिंग तंत्राचे दुरुपयोग मात्र वेगवेगळ्या क्षेत्रांत होताना दिसत आहेत. उदाहणार्थ, खरेदीसाठी वापरात असलेल्या डेबिट किंवा क्रेडिट कार्डांचे क्लोन करून ग्राहकांची आर्थिक फसवणूक केली जाते. प्रकाशनाचे क्षेत्रही यात मागे नाही. बनावट प्रकाशकांनी तंत्रज्ञानाचा दुरुपयोग करत चक्क 'रिसर्च जर्नल'चेही क्लोनिंग केले आहे. क्लोन जर्नल व त्याचे दुष्परिणाम यावर चर्चा होणे आवश्यक आहे.

नवसंशोधन सर्वांपर्यंत पोहोचविण्याचे काम उत्तम दर्जेदार जर्नल वर्षानुवर्षे करीत आहेत. कोणत्याही प्रथितयश जर्नलमध्ये प्रकाशक, संपादकीय मंडळ, लेखक/ संशोधक यांचा समावेश असतो. लेखकाने केलेले संशोधन विषय तज्ज्ञांनी तावून सुलाखून तपासल्यानंतरच प्रसिद्ध केले जाते. त्यामुळे वेळ खर्ची पडला, तरीही उत्तम जर्नलमध्ये पेपर प्रसिद्ध झाल्यास एक वेगळेच समाधान आणि पुढील संशोधनास प्रोत्साहन मिळते. असे प्रामाणिकपणे केलेले संशोधनच मानवाची प्रगती करत असते. गेल्या दोन दशकांपासून मात्र संशोधनाचा संबंध शैक्षणिक व संशोधन संस्थांमध्ये भरती व पदोन्नतीसाठी लावला जाऊ लागला, तेव्हापासून संशोधन प्रकाशनात प्रचंड उलथापालथ झाली. अधिकाधिक(दर्जाहीन) रिसर्च पेपर प्रसिद्ध करण्याची एक शर्यत संशोधकांत सुरू झाली. परिणामी बनावट जर्नल अस्तित्वात आली. संशोधनाचा दर्जाही खालावला. दर्जेदार, प्रथितयश जर्नलमध्ये संशोधन प्रसिद्ध केले तर जास्त गुण मिळतात; पण त्यासाठी संशोधनाचा दर्जा उत्तम असावा लागतो. अशा संशोधनासाठी वेळ लागतो. बनावट प्रकाशकांनी हे अचूक हेरून संशोधकांची दिशाभूल करत त्यांनी चक्क दर्जेदार प्रथितयश जर्नलची नक्कल करून त्यांचे क्लोन तयार केले. जेफ्री बिल यांना २०११ मध्ये 'टेक्सास जर्नल ऑफ सायन्स' या जर्नलचे पहिले क्लोन निदर्शनास आले. त्यानंतर जगभरातील संशोधकांनी वेगवेगळ्या पद्धतींचा वापर करून बरीच क्लोन जर्नल शोधून काढली. भारतात विद्यापीठ अनुदान आयोगाने 'यूजीसीकेअर' अंतर्गत क्लोन जर्नलची यादी वेबसाइटवर उपलब्ध करून दिली आहे. बनावट प्रकाशकांनी प्रथितयश मूळ, विश्वासार्ह जर्नलचे बाह्यस्वरूप म्हणजेच शीर्षके, लोगो आणि वेबसाइटचे डिझाइन चोरून क्लोन आवृत्त्या तयार केल्या आहेत. यात मूळ जर्नलच्या संपादकांची नावेही कॉपी केलेली असतात. क्लोन जर्नलचे बाह्यस्वरूप दर्जेदार जर्नलसारखे असले तरी अंतरंग खूपच विसंगत असते.

कोणत्याही विषयावरील रिसर्च पेपर यात छापलेले असतात, तेही पैसे घेऊनच! जर्नलचे नाव आणि त्यातील लेख किंवा पेपर यांचा काहीच ताळमेळ नसतो. अशी जर्नल संशोधकांना आकर्षित करण्यासाठी बहुविद्याशाखीय आणि बहुभाषिक असतात.

# भारत जोडो'मुळे थेट काँग्रेसला नव्हे, पण लोकशाहीला संजीवनी...

**काँग्रेसने भारत जोडो यात्रेमुळे लगेच निवडणुकांत यश मिळू लागेल, अशी अपेक्षा न ठेवता, संघटनात्मक वाढीवर लक्ष केंद्रित केले पाहिजे...**

राहुल गांधी यांची कन्याकुमारी ते काश्मीर ही 'भारत जोडो यात्रा' दोन महिन्यांपेक्षा अधिक काळापासून सुरू आहे. ६ नोव्हेंबरपासून ती महाराष्ट्रात आली आहे. १५ दिवस विदर्भ आणि मराठवाडा या मागास भागांतून ही यात्रा जात आहे. काँग्रेसची ही यात्रा महत्त्वाची का आहे? या यात्रेमुळे कोणते राजकीय बदल होतील, हे जाणून घेणे महत्त्वाचे आहे. भारत तुटलेला आहे म्हणून जोडायचा आहे का, ही यात्रा राजकीय आहे की नाही, असे अनेक प्रश्न चर्चेला येत आहेत. विविध संस्था, संघटना, विचारवंत, लेखक, राजकीय नेते हे या यात्रेला पाठिंबा देत असून, हा विषय फार महत्त्वाचा आहे. लोकशाही म्हटले की, एक सत्ताधारी प्रमुख पक्ष राहील आणि सोबत काही विरोधी पक्षही राहतील, ही भारतीयांनी आतापर्यंत अनुभवलेली लोकशाही आहे आणि तीच खरी लोकशाही आहे. परंतु, सध्या भारतात विचित्र राजकीय परिस्थिती निर्माण झाली आहे. अलीकडच्या काही वर्षांत सत्ताधारी भाजपने एकपक्षीय लोकशाही निर्माण केल्याचे चित्र दिसते. विविध विरोधी पक्ष



शिल्लक राहायला नकोत, आमचाच पक्ष राहिला पाहिजे, ही भाजपची मानसिकता आहे. आता पारंपरिक लोकशाहीसमोर जे आव्हान उभे आहे ते आहे भाजपप्रणीत एकपक्षीय लोकशाहीचे! भाजपतर्फे याचा बचाव असा केला जातो की, पूर्वीच्या काळात म्हणजेच काँग्रेसच्या काळात एकपक्षीय सत्ता नव्हती का? परंतु, सत्ता आणि पक्ष या दोन वेगवेगळ्या गोष्टी आहेत, हे लक्षात घेतले पाहिजे.

काँग्रेसची एकपक्षीय राजवट आपल्या देशात होती तशी ती आता भाजपची आहे, याला कोणाचीही हरकत नाही. परंतु, एकपक्षीय लोकशाही, हे एक मोठे संकट घोंघावत आहे. अलीकडच्या १५-२० वर्षांच्या काळात आपल्या लोकशाहीचे विचित्र संक्रमण सुरू आहे. बहुमताची लोकशाही बहुसंख्याक वादाकडे चालली आहे. हा लोकशाहीला मोठा धोका आहे. हा धार्मिक आणि हिंस्र वाद आहे. समाजात दरी वाढावी आणि आपण सत्ताधारी व्हावे, ही जी महत्त्वाकांक्षा बाळगली जात आहे, हा आपल्या लोकशाहीसाठी फार मोठा धोका आहे.

विशेषत: २०१४ पासून- नरेंद्र मोदींच्या नेतृत्वाखालील सत्तेतून काही प्रश्न निर्माण झाले आहेत. राजकीय, सांस्कृतिक, सामाजिक क्षेत्रांत घुसमट दिसत आहे. आमच्याशिवाय कोणीच नको, ही भावना स्पष्टपणे नजरेस पडत आहे. त्यातून हा समाज दुभंगण्याचा धोका निर्माण झालेला आहे. या धोक्याच्या विरुद्ध कोणीतरी उभे राहण्याची गरज आहे. आपल्या देशात असे ठामपणे उभे राहणारे नेतृत्व शिल्लक राहिलेले नाही. जे उरले आहेत ते म्हणजे फक़्त राहुल गांधी आणि दोन-तीन अपवाद आहेत. राहुल गांधी हे सगळे प्रकरण सर्वांसमक्ष घेऊन चालले आहेत. यात राजकीय आणि राजकारणापलीकडचे याचा मिलाफ आहे, हे लक्षात घेतले पाहिजे.

## ।। अभंगवाणी ।।



एका जिवें आतां जिणें जालें दोहीं ।  
वेगळीक कांहीं नव्हे आतां ॥१॥  
नारायणा आम्हां नाहीं वेगळीक ।  
पुरविली हे भाक सांभाळिली ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक ः *सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक ः MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# एपीएमसी फळ बाजारात अग्नितांडव!

## 15-20 गाळे आगीच्या भक्ष्यस्थानी

।मुंबई। महाईन्यूज ।

मुंबई कृषी उत्पन्न फळ बाजारातील एन विंग मध्ये गुरुवारी सायंकाळी साडेचारच्या सुमारास अचानक आग लागली. या आगीत लाखो रुपयांची वित्तहानी झाली आहे. पुठ्ठे ,बॉक्स इत्यादी वस्तूंनी पेट घेतल्याने आग लागल्याचा प्राथमिक अंदाज वर्तविण्यात येत आहे. जवळजवळ १५ ते २० गाळे आगीच्या भक्षस्थानी सापडले. आग लागताच गाळ्यांमधील कर्मचाऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले. त्यामुळे दोन कामगारांनी पहिल्या मजल्यावरून उडी मारल्याने पायाला दुखापत होऊन जखमी झाले असून त्यांना महापालिकेच्या रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. ही आग आटोक्यात आणण्यासाठी अग्निशमन दलानी तब्बल २ ते अडीच तास अथक प्रयत्न केल्यानंतर आग आटोक्यात आणण्यास यश प्राप्त झाले आहे. परंतु या आगीच्या घटनेने पुन्हा एकदा एपीएमसी बाजार समितीतील अनधिकृत वापर आणि अग्नि सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.




> वाशी फळ बाजारात ४.३६ मिनिटांचा कॉल होता. त्या ठिकाण अग्निशामक दलाच्या ६ ते ७ गाड्या घटनास्थळी दाखल झाल्या होत्या. आग कशामुळे लागलेली आहे हे स्पष्ट झाले नसून प्रथम दर्शनी तेथे मोठ्या प्रमाणात पुठ्ठे होते त्यामुळे आग लागल्याचा अंदाज व्यक्त करण्यात येत आहे. ८-१० गाळ्यांचे नुकसान झाल्याचे अंदाज असून ४-५ शेड जळून खाक झाले आहेत
>
> **-पुरुषोत्तम जाधव,** विभागीय अग्निशमन अधिकारी, वाशी

मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीमधील फळ बाजारात सायंकाळी साडे चार वाजण्याच्या सुमारास अचानक एन एन विंग मध्ये आग लागली. याठिकाणी मोठ्या प्रमाणावर पुठ्ठे, बॉक्स, इत्यादी जळाऊ वस्तू होत्या. त्यामुळे बघता बघता क्षणार्धात आगीने रौद्ररूप धारण केले. ही आग आटोक्यात आणण्यासाठी ४ वाजून ३६ मिनिटांनी अग्निशमन दल बाजारात दाखल झाले. वाशी आणि नेरुळ येथील अग्निशमन दलाच्या ६ ते ७ अग्निशमन बंब घटनास्थळी पोहचल्या. मोठ्या प्रमाणात जळाऊ खोके असल्याने आगीचे लोळ लांबपर्यंत पोचले . त्यामुळे आग आटोक्यात आणण्यासाठी अग्निशमन दलाला अथक प्रयत्न करावे लागले आहेत. त्यामध्येच बघ्यांनी गर्दी केल्याने आग विझविण्यासाठी अडचणी येत होत्या. त्यामुळे पोलिसांच्या मदतीने गर्दीवर नियंत्रण मिळवून चारही बाजूने पाण्याचा फवारा केल्याने आग आटोक्यात आली. मात्र तबबल दोन ते अडीच तासानंतर आगीवर नियंत्रण मिळवण्यात अग्निशमन दलाला यश आले. साधारणतः २५-३०गाळ्यांना आगीची झळ बसली आहे.

## शॉर्ट न्यूज

### शेगाव येथे उद्या काँग्रेसचे शक्तिप्रदर्शन



। बुलढाणा । महाईन्यूज ।

शेगावच्या सभेसाठी काँग्रेसने जणू 'दिवसाची रात्र' करणे सुरू केले आहे. १९ एकर शेत, अडीच लाखांवर प्रेक्षक क्षमता, १८ सेक्टर अन् ११ प्रवेशद्वार, अशी जय्यत तयारी जोरात सुरू आहे. कन्याकुमारी ते काश्मीर अशा भारत जोडो पदयात्रेवर निघालेले काँग्रेस नेते खा. राहुल गांधी यांची महाराष्ट्रातील दुसरी सभा बुलढाणा जिल्ह्यातील शेगाव येथे शुक्रवारी होणार आहे. ही सभा जंगी व्हावी यासाठी प्रदेश काँग्रेस, राज्यातील प्रमुख नेते ते जिल्हा काँग्रेस असे सर्वच नियोजनात व्यस्त आहेत. ही सभा काँग्रेसने गंभीरतेने घेतली आहे. पक्षातील मरगळ दूर सारून नवचैतन्य निर्माण करता यावे यासाठी अनेक दिग्गजांनी आपली राजकीय झूल दूर सारून व विशेष म्हणजे, पक्षांतर्गत गटातटाचे राजकारण काही काळासाठी लांब ठेवून शेगावात मुक्काम ठोकला आहे.

# उसदरासाठी ट्रॅक्टर पेटवल्याने आंदोलन चिघळण्याची चिन्हे!

## साताऱ्यात रास्त उसदरासाठी खदखद

।कराड। महाईन्यूज ।

स्वाभिमानी शेतकरी संघटनेने ऊसदराच्या प्रमुख मागणीसाठी राज्यभरासाठी पुकारलेल्या दोन दिवसीय उसतोड बंद आंदोलनाची सुरुवात होत असतानाच बुधवारी रात्री उशिरा ऊस वाहतूक करणारा ट्रॅक्टर कराडजवळ पेटवून देण्यात आल्याने हे आंदोलन चिघळण्याची चिन्हे आहेत.

उसाला एफआरपी अधिक किमान साडेतीनशे रुपये उसदर जाहीर करावा. संपूर्ण एफआरपी पहिली उचल म्हणून तर उर्वरित साडेतीनशे रूपये त्यानंतर देण्यात यावे या आपल्या मागणीकडे राज्यकर्ते व साखर कारखानदारांचे लक्ष वेधण्यासाठी "स्वाभिमानी'चे नेते, माजी खासदार राजू शेट्टी यांनी आज गुरुवारी (दि. १७) व उद्या शुक्रवारी (दि. १८) या दोन दिवसात राज्यभर उसतोड बंद ठेवण्याचे आवाहन शेतकऱ्यांना केले होते. तर,

### साताऱ्यात रास्त उसदरासाठी खदखद

कोल्हापूर या शेजारच्या जिल्ह्यात सातारा जिल्ह्याइतकाच साखरेचा उतारा असताना कोल्हापूरमधील साखर कारखान्यांनी ३,२०० रुपयांप्रमाणे प्रतिटन उसाची पहिली उचल जाहीर केली आहे. परंतु, सातारा जिल्ह्यातील साखर कारखानदार मुग गिळून गप्प आहेत. त्यामुळे रास्त ऊसदरासाठी विशेषतः ग्रामीण जनतेत खदखद दिसते आहे. एफआरपी अधिक साडेतीनशे रुपये असा उसदर जाहीर करावा अशी स्वाभिमानी शेतकरी संघटनेची मागणी आहे. तर, अशाच मागणीसाठी उसदर संघर्ष समितीची स्थापना होवून त्या माध्यमातून शेतकरी व सामाजिक संघटना एकवटल्या आहेत. त्यांच्याकडून लोकशाही मार्गाने आंदोलने सुरु आहेत. स्वाभिमानीचा उसतोड बंदीचा इशारा आणि ऊस संघर्ष समितीच्या माध्यमातून दिसणारी आंदोलकांची एकजूट पाहता साताऱ्यात उसदराचे आंदोलन तीव्र होण्याची चिन्हे आहेत.

# नारायण राणेंच्या 'अधीश' बंगल्यातील बेकायदा बांधकामावर अखेर हातोडा!

## राणेंच्या बंगल्यातील बेकायदा बांधकाम पाडण्यास सुरुवात

।नाशिक ।महाईन्यूज ।

केंद्रीय मंत्री नारायण राणे यांच्या मुंबईतील 'अधीश' बंगल्यातील बेकायदा बांधकाम पाडण्यास अखेर सुरुवात झाली आहे. राणे कुटुंबाकडूनच जुहू येथील आपल्या बंगल्यातील बेकायदा बांधकाम पाडलं जात आहे. नितेश राणे यांनी 'एबीपी माझा'शी बोलताना ही माहिती दिली. कोर्टाने अनधिकृत बांधकाम पाडण्याचे आदेश दिल्यानंतर राणे कुटुंबाकडूनच हातोडा चालवला जात आहे. न्यायालयाने राणेंना 'अधीश'मधील बांधकाम स्वत:हून हटवावे अथवा मुंबई महानगरपालिकेने पाडकाम केल्यास त्याचे पैसे वसूल करण्याचा इशारा नोटीसमध्ये दिला होता.



नारायण राणे यांनी जुहू येथे बांधलेल्या आठ मजली 'अधीश' बंगल्यात मोठ्या प्रमाणावर अंतर्गत बदल केल्याची, अतिरिक्त बांधकाम केल्याची, तसंच सीआरझेड नियमांचं उल्लंघन झाल्याची तक्रार माहिती अधिकार कार्यकर्ते संतोष दौंडकर यांनी काही वर्षांपूर्वी मुंबई महानगरपालिकेकडे केली होती. या तक्रारीची दखल घेऊन महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांनी २१ फेब्रुवारी रोजी 'अधीश' बंगल्याची पाहणी केली होती. पाहणीदरम्यान 'अधीश'मध्ये अंतर्गत फेरबदल करण्यात आल्याचे अधिकाऱ्यांच्या निदर्शनास आलं होतं. त्यानंतर इमारतीचा आराखडा आणि प्रत्यक्ष बांधकामाची पडताळणी करण्यात आली व बांधकाम अनधिकृत आहे यावर शिक्कामोर्तब झालं. मुंबई महापालिकेने 'अधीश' बंगल्यात बेकायदा बांधकाम करण्यात आल्याचं निदर्शनास आणल्यानंतर नारायण राणे यांनी उच्च न्यायालयात धाव घेतली होती. मात्र उच्च न्यायालयाने त्यांना दिलासा देण्यास नकार दिला होता. दरम्यानच्या काळात राज्यात सत्तांतर झाले. राणे यांनी अधीशमधील अनधिकृत बांधकाम नियमित करण्यासाठी अर्ज केला आणि पुन्हा एकदा उच्च न्यायालयात धाव घेतली. मात्र यावेळी मुंबई महानगरपालिकेने मौन बाळगलं होतं. ही बाब खटकल्याने उच्च न्यायालयाने महानगरपालिकेवर ताशेरे ओढले होते.

उच्च न्यायालयाने हे बांधकाम अनधिकृत ठरवून त्यावर दोन आठवड्यांत कारवाई करण्याचे आदेश महानगरपालिकेला दिले होतं. इतकंच नव्हे तर मुंबई महानगरपालिकेकडे अनधिकृत बांधकाम अधिकृत करण्यासाठी दुसऱ्यांदा केलेला राणे यांचा अर्ज न्यायालयाने चुकीचा ठरविला आणि १० लाख रुपये दंड ठोठावला.

# चेंडू समजून बॉम्बशी खेळणाऱ्या 8 वर्षांच्या चिमुकलीचा जागीच मृत्यू!

## तृणमूल काँग्रेसच्या नेत्याच्या घरात घडलेल्या प्रकारामुळे खळबळ

**। नवी दिल्ली ।**
**महाईन्यूज ।प्रतिनिधी।**

पश्चिम बंगालमधील उत्तर २४ परगना जिल्ह्यामधील मिनाखा येथील तृणमूल काँग्रेसचे नेता अबू हुसैन गायेन यांच्या घरात एक विचित्र अपघात घडला आहे. गायेन यांच्या घरातील बॉम्बला चेंडू समजून त्याबरोबर खेळणाऱ्या घरातील एका चिमुकलीचा बॉम्बचा स्फोट झाल्याने मृत्यू झाला आहे. तसेच या अपघातामध्ये काही मुलं जखमी झाली आहे. या प्रकरणामध्ये पोलिसांनी अबु हुसैन यांना अटक केली आहे. ही घटना चपाली गावामध्ये घडली. पोलिसांना या घटनेसंदर्भात सविस्तर माहिती दिली आहे.



“बुधवारी सायंकाळी सहा वाजण्याच्या सुमारास तृणमूल काँग्रेसचे नेते अबुल हुसैन गायेन यांच्या घरी काही नातेवाईक आले होते. यामध्ये नातेवाईकांमध्ये त्यांच्या आठ वर्षांच्या भाचीचाही सामवेश होता. झूमा खातून असं या भाचीचं नाव असून ती दुसऱ्या इयत्तेतमध्ये शिकत होती. ही मुलगी गायेन यांचं पाळीव गाढव बांधून ठेवण्यात आलेल्या ठिकाणी गाढावच्या डोक्याजवळ बांधलेल्या बॉम्बशी चेंडू समजून खेळत होती. त्याचवेळी या बॉम्बचा स्फोट झाला आणि झूमाचा जागीच मृत्यू झाला,” असं पोलिसांनी सांगितलं आहे. बशीरहाटचे अतिरिक्त पोलीस अधिक्षक सौथम बॅनर्जी आणि एसडीपी अमीन इस्लाम यांच्या नेतृत्वामध्ये मिनाखाचे पोलीस स्थानक प्रमुख सिद्धार्थ मंडल यांनी मोठ्या फौजफाट्यासहीत मुख्यमंत्री मतता बॅनर्जींच्या पक्षाचे नेते असलेल्या गायेन यांच्या घरी पोहोचले. त्यांनी घटनास्थळाची पहाणी करुन झूमाचा मृतदेह ताब्यात घेतला. त्यानंतर हा मृतदेह ग्रामी रुग्णालयामध्ये ठेवण्यात आला होता. या अपघाताची पंचक्रोषीमध्ये चर्चा आहे. गायेन यांनी गाढवाच्या कपाळावर बॉम्ब का बांधला होता? हे राजकीय षडयंत्र आहे का? या प्रश्नांच्या उत्तराचा शोध पोलीस घेत आहेत. पोलीस अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार गायेन यांनी पंचायत निवडणुकीमध्ये आपला दबदबा निर्माण करण्याच्या दृष्टीने घरात बॉम्ब जमा केले होते अशी माहिती दिली. गायेन यांना ताब्यात घेऊन पोलिसांनी तपास सुरु केला आहे.

# सावरकरांवरील वक्तव्याविरोधात ठाण्यात शिंदेगट आक्रमक

## राहुल गांधींच्या प्रतिमेला जोडो मारून निषेध



**।ठाणे ।महाईन्यूज ।**
**वृत्तसंस्था ।**

भारत जोडो यात्रेत काँग्रेसचे माजी अध्यक्ष राहुल गांधी यांनी स्वातंत्रवीर सावरकर यांच्याबाबत केलेल्या वादग्रस्त विधानाच्या विरोधात ठाण्यात शिंदे गटाने टेंभी नाका येथे आंदोलन केले. यावेळी राहुल गांधीच्या प्रतिमेला जोडे मारून त्यांच्या आक्षेपार्ह वक्तव्याचा निषेध केला. तसेच राहुल गांधी यांच्या विरोधात जोरदार घोषणाबाजी देखील करण्यात आली. तर सावरकरांच्या संदर्भात अशी वादग्रस्त विधानं खपवून घेणार नसल्याचा इशारा आंदोलनकर्त्यांनी यावेळी दिला.

टेंभीनाका परिसरात झालेल्या आंदोलनात आमदार प्रताप सरनाईक, शिंदे गटाचे प्रवक्ते नरेश म्हस्के यांच्यासह शिंदे गटाचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. महाराष्ट्रातील हिंगोली येथे राहुल गांधी यांनी भारत जोडो यात्रेच्या दरम्यान स्वातंत्रवीर सावरकर यांच्या विरोधात वादग्रस्त विधान केले. यावर संपूर्ण महाराष्ट्रात पडसाद उमटले असताना, ठाण्यातही टेंभी नाका परिसरात राहुल गांधीच्या विरोधात जोरदार घोषणाबाजी करण्यात आली. यावेळी त्यांच्या प्रतिमेला जोडे मारून निषेध करण्यात आला.

# आमटे दापत्याला जीवनगौरव पुरस्कार

**।नवी दिल्ली ।महाईन्यूज ।**
**वृत्तसंस्था ।**

येथील सीएसवाय सभागृहात १८ नोव्हेंबर रोजी होणाऱ्या चांगुलपणाच्या राष्ट्रीय शिखर संमेलनात माजी राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांच्या हस्ते डॉ. प्रकाश आमटे आणि डॉ. मंदाकिनी आमटे यांना ‘चांगुलपणाचा जीवन गौरव पुरस्कारा’ने गौरविण्यात येणार आहे. याप्रसंगी वेगवेगळ्या क्षेत्रात काम करणाऱ्या अनेक व्यक्तींना चांगुलपणाचे पुरस्कार प्रदान करण्यात येतील.

संमेलनाचे उद्‌घाटन कोविंद व राष्ट्रीय मानवाधिकार आयोगाचे अध्यक्ष माजी न्यायमूर्ती अरुण मिश्रा यांच्या हस्ते तर, समारोप राज्यसभेचे उपसभापती हरिवंशजी यांच्या उपस्थितीत होणार आहे. दिवसभर चालणाऱ्या कार्यक्रमांमध्ये आयसीसीआरचे अध्यक्ष डॉ. विनय सहस्त्रबुद्धे, परराष्ट्र राज्यमंत्री मीनाक्षी लेखी, एअर मार्शल अजित भोसले, धनमंजुरी विद्यापीठ मणिपूरचे उपकुलगुरू नोंगामैथम सिंग, अमेरिकेच्या दलास ग्रुपचे सहसंस्थापक



संजीव खन्ना यांची प्रमुख उपस्थिती आहे.

माजी परराष्ट्र सचिव ज्ञानेश्वर मुळे यांच्या संकल्पनेतून चांगुलपणाची चळवळ साकार झाली आहे. भारतीय संविधानातील स्वातंत्र्य, समता व न्याय या मूल्यांवर आधारित वेगवेगळ्या प्रकारचे जनजागृतीचे कार्यक्रम घेणे, समाजात प्रत्यक्षात तळागाळात जाऊन सामाजिक कार्य करणे हा चांगुलपणाच्या चळवळीचा उद्देश आहे. समाजात चांगुलपणा कसा रूजवता येईल यावर विविध सत्रांमध्ये मंथन होईल. स्वातंत्र्यानंतर ७५ वर्षांमधील भारताचा लेखाजोखा, सामाजिक न्याय व अंमलबजावणी तसेच पुढील २५ वर्षांचा देशाचा प्रवास यावर संमेलनात चर्चा होईल.

# राणमध्ये हल्लेखोरांकडून बाजारपेठेत अंदाधुंद गोळीबार

## सेंट्रल मार्केटमध्ये गो ळीबारात5 ठार तर 10 जखमी

**।इराण ।महाईन्यूज ।**
**वृत्तसंस्था ।**

इराणमधील सेंट्रल मार्केटमध्ये अज्ञात हल्लेखोरांनी अंदाधुंद गोळीबार केल्याची घटना समोर आली आहे. या हल्ल्यात ५ जणांचा मृत्यू झाला असून १० जण जखमी झाले आहेत. दक्षिण-पश्चिम इराणमधील इजेह शहरात हे थरारक कृत्य घडलं आहे. दोन मोटरसायलकवरुन एजेह शहराच्या सेंट्रल मार्केटमध्ये हल्लेखोर पोहोचले आणि तिथे उपस्थित असलेल्या नागरिकांवर अंदाधुंद गोळीबार केला. तसंच, सुरक्षा दलांवरही गोळीबार करण्यात आला आहे. या भीषण हल्ल्यात पाच लोक जागीच ठार




झाले आहेत. तर, आत्तापर्यंत किमान १० जण जखमी झाले आहेत. या हल्ल्याची जबाबदारी अद्याप कोणीही स्वीकारली नाहीये.

दरम्यान, याआधीही २६ ऑक्टोबर रोजी शिराज येथे गोळीबार करण्यात आला होता. या हल्ल्यात १३ जणांचा मृत्यू झाला होता. शिया समुदायाचे पवित्र स्थान शाह चेराग येथे ही घटना घडली. या हल्ल्याची जबाबदारी इसिस या दहशतवादी संघटनेने स्वीकारली होती. १६ डिसेंबर रोजी मेहसा अमिनीचा पोलिस कोठडीत मृत्यू झाला होता. ती तीन दिवस पोलिस कोठडीत होती. तिच्यावर इराणच्या ड्रेस कोडचं उल्लंघन केल्याचा आरोप होता. मेहसा अमिनीच्या मृत्यूनंतर ईराणमध्ये मागील दोन महिन्यांपासून प्रदर्शन सुरू आहेत. यात आत्तापर्यंत शेकडो आंदोलकांचा मृत्यू झाला आहे. तर, काही सुरक्षारक्षकांचाही मृत्यू झाल्याचा दावा प्रशासनाने केला आहे.

# एका अक्षरामुळे उर्मिला कोठारे आर्थिक फसवणुकीपासून वाचली

देशात डिजीटल व्यवहारात झपाट्याने वाढ होत आहे. त्यामुळे सायबर गुन्हेगारीच्या घटनाही वाढताना दिसत आहे. महाराष्ट्रासह मुंबईतही या घटनेत जास्त वाढ होताना दिसत आहे. पण याबद्दल पुरेसे ज्ञान असल्यास तुम्हाला या घटना टाळता येतात. नुकतंच मराठी सिनेसृष्टीतील एका अभिनेत्री सायबर क्राइमची शिकार होता होता वाचली आहे. तिने स्वत: याबद्दलची माहिती दिली आहे.



अभिनेत्री उर्मिला कोठारे ही कायमच सक्रीय असते. गोड निरागस, सालस, देखणी अभिनेत्री म्हणून उर्मिला कोठारेला ओळखले जाते. नुकतंच तिने इन्स्टाग्रामवर एक पोस्ट शेअर केली आहे. यात तिने कशाप्रकारे सायबर क्राइमची शिकार होता होता वाचली याबद्दल सांगितले आहे.

आणखी वाचा : उर्मिला आणि आदिनाथ कोठारे यांच्यात बिनसलं? चर्चांना उधाण

उर्मिला कोठारेने एक इन्स्टाग्रामवर स्टोरी शेअर केली आहे. यात तिने तिच्या एका मेसेजचा स्क्रीनशॉट पोस्ट केला आहे. यात तिने एचडीएफसी बँकेबद्दल आलेल्या फ्रॉड मेसेजबद्दल उल्लेख केला आहे. तिला आलेल्या मेसेजमध्ये म्हटले आहे की, 'तुम्ही एचडीएफसी बँकेतील खात्याची केवायसी अपडेट केलेली नाही. त्यामुळे ते ब्लॉक करण्यात आले आहे. केवायसी अपडेट करण्यासाठी खाली दिलेल्या लिंकवर क्लिक करा', असे यात म्हटले आहे.

उर्मिला कोठारेने तिला आलेला हा मेसेज वाचला. या मेसेजमध्ये असलेल्या लिंकवरुन तिला संशय आला. तसेच तो फ्रॉड असल्याचे तिला समजले. या मेसेजचा स्क्रीनशॉट शेअर करत तिने याबद्दल भाष्य केले आहे. मला नुकताच एक मेसेज आला. अनेकजण अशाप्रकारे आलेले मेसेज वाचून पॅनिक होतात आणि यासारख्या लिंकवर क्लिक करतात. त्यामुळे तुम्ही तुमच्या खासगी गोष्टींची माहिती फ्रॉड लोकांकडे जाते. यामुळे तुमचे बँक अकाऊंट हॅक होऊ शकते. मी ती लिंक पाहिली यात HDFC बँकचे नाव पूर्ण लिहिण्यात आले नव्हते. त्यामुळे मला शंका आली. सॉरी आज तुमचे नशिब कमजोर आहे", असे तिने म्हटले आहे.

दरम्यान उर्मिलाने हा मेसेज वाचल्यामुळे ती सायबर क्राईमची शिकार होता होता वाचली आहे. मात्र तिने तिच्या चाहत्यांना तसेच सर्वसामान्यांना याबद्दल सतर्क केले आहे. अशाप्रकारे मोबाईलवर येणाऱ्या लिंकवर क्लिक करु नका, असेही आवाहन केले आहे.




# उनाड' चित्रपट लवकरच प्रेक्षकांच्या भेटीस

जिओ स्टुडिओज प्रस्तुत, बहुचर्चित व प्रख्यात चित्रपट दिग्दर्शक आदित्य सरपोतदार यांचा चित्रपट 'उनाड' उन्हाळ्यात २०२३ ला हा चित्रपट प्रेक्षकांच्या भेटीला येत आहे. ज्योती देशपांडे, अजित अरोरा, चंद्रेश भानुशाली आणि प्रितेश ठक्कर निर्मित 'उनाड' चित्रपट तरूणांवर चित्रीत असून आशुतोष गायकवाड, हेमल इंगळे, अभिषेक भराटे, चिन्मय जाधव, देविका दफ्तरदार आणि संदेश जाधव हे कलाकार प्रमुख भूमिकेत झळकणार आहेत.

चित्रपटाबद्दल दिग्दर्शक आदित्य सरपोतदार म्हणतात, " 'उनाड' हा चित्रपट तरूणांवर चित्रीत करण्यात आला असून हा चित्रपट पुढील वर्षी उन्हाळ्यात प्रदर्शित होत आहे. चित्रपट युवकांना योग्य दिशा दाखवणारा ठरेल अशी मला आशा आहे. "चेक रिपब्लिक (CZECH REPUBLIC) येथे झालेल्या झ्लिन आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात (ZLIN INTERNATIONAL FILM FESTIVAL) युवा विभागातील फिचर फिल्म्सच्या आंतरराष्ट्रीय स्पर्धेकरीता अधिकृत प्रवेशिका म्हणून 'उनाड'ची नुकतीच निवड झाली. 'उनाड'ही महाराष्ट्रातील एका छोट्या गावातील हर्णे येथील मासेमारी करणाऱ्या तीन युवकांची कथा आहे.

शुभ्या, बंड्या व जमील हे तीन कोणतेही ध्येय नसलेले मित्र गावात दिवसभर हुंदडतात. गावातील सर्व स्थानिक त्यांना उनाड समजत असल्याने, तिघेही अडचणीत सापडतात. त्यांच्या आयुष्याच्या टप्प्यातील ही कहाणी आहे जी त्यांना कायमची बदलते.

# "अपूर्वा नेमळेकर खोटारडी..." बिग बॉसच्या घरातून बाहेर पडल्यानंतर रुचिरा जाधवचं स्पष्ट वक्तव्य




बिग बॉस मराठीचा चौथं पर्व सध्या बराच गाजतंय. नुकत्याच झालेल्या एलिमिनेशनमध्ये रुचिरा जाधव बिग बॉसच्या घरातून बाहेर पडली. रुचिरा या पर्वात तिचा रिअल लाइफ बॉयफ्रेंड डॉक्टर रोहित शिंदेबरोबर सहभागी झाली होती. पण आता रोहित बिग बॉस घरात कायम असून रुचिरा मात्र घरातून बाहेर पडली आहे. बिग बॉसच्या घरात असताना दोघांमध्येही मतभेद झाल्याचंही पाहायला मिळालं. त्यानंतर बिग बॉसच्या घरातून बाहेर पडल्यानंतर रुचिराने बॉयफ्रेंड रोहित शिंदेला सोशल मीडियावर अनफॉलो केलं. त्यानंतर इन्स्टाग्राम लाइव्ह करत तिने याचं कारण दिलं होतं. पण यासोबतच तिने अपूर्वा नेमळेकरबद्दलही स्पष्ट मत मांडलं आहे.

रुचिराने बिग बॉसच्या घरातून बाहेर पडल्यानंतर इन्स्टाग्रामवर लाइव्ह सेशन घेतलं होतं. या लाइव्ह सेशनमध्ये तिने चाहत्यांच्या सर्व प्रश्नांची उत्तरं दिलं. तिच्या आणि रोहितच्या नात्यावरही भाष्य केलं. तसेच घरातील इतर सदस्यांबद्दलही मत व्यक्त केलं. रुचिरा जाधवच्या इन्स्टाग्राम लाइव्हचा व्हिडीओ सध्या व्हायरल होत असून तिने बिग बॉस सदस्य अपूर्वा नेमळेकरबद्दल परखड मत व्यक्त केलं आहे.

# हेमंत ढोमे दिग्दर्शित 'सनी' लवकरच होणार प्रदर्शित

गेल्या वर्षी 19 नोव्हेंबर ला 'झिम्मा'ने लोकांना वेड लावले होते तर या वर्षी पुन्हा त्याच शुक्रवारी 'सनी' लोकांचे मनोरंजन करण्यासाठी येत आहे. लॉकडाऊननंतर पहिल्यांदाच 'झिम्मा' या सुपरहिट ठरलेल्या सिनेमानंतर हेमंत ढोमे यांचा 'सनी' हा सिनेमा प्रेक्षकांच्या भेटीला येत आहे. 'झिम्मा' नंतर प्रेक्षकांच्या अपेक्षा अजूनच उंचावल्या आहेत. प्रेक्षकांच्या हयाच अपेक्षांवर खरे उतरण्यासाठी बरोबर एक वर्षांनी 'सनी' हा सिनेमा 18 नोव्हेंबरला प्रेक्षकांच्या भेटीला येत आहे.




'सनी' हा सिनेमा 18 नोव्हेंबरला चित्रपटगृहात प्रदर्शित होणार आहे. ललित प्रभाकर यात 'सनी'ची मध्यवर्ती भूमिका साकारत असून ह्या सिनेमाचे दिग्दर्शन हेमंत ढोमे यांनी केले आहे. अक्षय विलास बर्दापूरकर, क्षिती जोग, विराज गवस व उर्फी काझमी हे सिनेमाचे निर्माते आहेत. तसेच संतोष खेर, तेजस्विनी पंडित सह-निर्माते असून सिनेमाचे लेखन इरावती कर्णिक यांनी केलेले आहे. दिग्दर्शक हेमंत ढोमे सिनेमाबद्दल म्हणतात, " 'झिम्मा' ला मिळालेल्या उत्तम प्रतिसादानंतर प्रेक्षकांशी एक वेगळं नातं तयार झालंय आणि त्या आपुलकीच्या नात्यानेच आम्ही जबाबदारीने 'सनी' हा सिनेमा घेऊन आलोय. आपल्या आयुष्याबद्दल चांगलं वाटायला लावणारी ही कथा प्रेक्षकांसमोर आणताना प्रचंड आनंद होतोय. प्रेक्षकांनी ज्याप्रमाणे 'झिम्मा'ला प्रेम दिले तसेच ते 'सनी'ला हि मिळेल अशी खात्री आहे."

# घटस्फोटाच्या ५ वर्षांनंतर मलायका- अरबाजमध्ये पुन्हा जवळीक?

अरबाज खानने इन्स्टाग्रामवर हा फोटो शेअर केल्यानंतर मलायकाने त्यावर कमेंट केली आहे.


मागच्या काही दिवसांपासून एक्स कपल अरबाज खान आणि मलायका अरोरा सोशल मीडियावर सातत्याने चर्चेत आहेत. दोघंही एकमेकांशी बोलताना दिसत आहेत. नुकतंच अरबाजने त्याचा आगामी चित्रपट 'पटना शुक्ला'च्या शूटिंगला सुरुवात केली. या चित्रपटाचं शूटिंग भोपाळ येथे सुरू असून याची माहिती अरबाजने सोशल मीडियावर एक पोस्ट शेअर करत दिली आहे. त्याच्या याच पोस्टवर पूर्वाश्रमीची पत्नी मलायका अरोराने कमेंट केली आहे. तिची ही कमेंट सोशल मीडियावर चर्चेत आहे.



अरबाज खानने त्याच्या इन्स्टाग्रामवर क्लॅपबोर्डचा फोटो शेअर केला आहे. हा फोटो शेअर करतानाच्या चित्रपटाचं शूटिंग सुरू झाल्याची माहिती दिली आहे. अरबाजने लिहिलं, "अरबाज खान प्रोडक्शनचा आगामी चित्रपट 'पटना शुक्ला'च्या शूटिंगला सुरूवात. या चित्रपटात रवीना टंडन, सतिश शुक्ला आणि मानव विज दिसणार आहेत." या चित्रपटाचं संपूर्ण शूटिंग हे भोपाळमध्ये होणार आहे. अरबाज खानने इन्स्टाग्रामवर हा फोटो शेअर केल्यानंतर मलायकाने त्यावर कमेंट केली आहे. मलायकाने कमेंटमध्ये लिहिलं, "ऑल द बेस्ट" काही वेळाने मलायकाने ही कमेंट डिलीट केली मात्र तोपर्यंत त्याचे स्क्रिनशॉट सोशल मीडियावर व्हायरल झाले होते. मलायका अरोराची ही कमेंट सध्या सोशल मीडियावर व्हायरल होताना दिसत आहे आणि आता या दोघांमधील संबंध सुधारत असल्याचं, तसेच दोघांमध्ये सर्वकाही ठीक झाल्याचं बोललं जात आहे. याशिवाय अरबाजची गर्लफ्रेंड जॉर्जियानेही यावर कमेंट करत प्रेम व्यक्त केलं आहे.

# ओपनिंग सेरेमनीमध्ये बॉलिवूड अभिनेत्रीचे ठुमके

**मुंबई।**
**महाईन्यूज । वृत्तसंस्था**



रविवारपासून सुरू होणाऱ्या कतार फिफा विश्वचषक स्पर्धा २०२२च्या उद्घाटन समारंभात पाच आंतरराष्ट्रीय पुरस्कार विजेते संगीतकार आपली कला सादर करताना दिसणार आहेत. हा भव्य उद्घाटन सोहळा दोहा येथील अल बिद्दा पार्क येथे होणार आहे, ज्यामध्ये जगभरातील २० हून अधिक कलाकार संध्याकाळची रंगत वाढवतील.

आयोजक डिप्लो, किझ डॅनियल्स, नोरा फतेही, त्रिनिदाद कार्डोना आणि केल्विन हॅरिस यांच्याशी चर्चा करत आहेत. २२ नोव्हेंबरला डिप्लो, २३ नोव्हेंबरला किझ, २९ नोव्हेंबरला नोरा, १ डिसेंबरला त्रिनिदाद आणि १० डिसेंबरला कॅल्विन वेगवेगळ्या टप्प्यांवर परफॉर्म करणार असल्याची माहिती आहे.

या टुर्नामेंटचे 'लाइट द स्काय' हे गाणे स्पर्धा सुरू होण्यापूर्वी रिलीज करण्यात आले आहे. यामध्ये बॉलिवूड अभिनेत्री नोरा फतेहीने परफॉर्म केला आहे. FIFA ने ७ ऑक्टोबर रोजी हे गाणे रिलीज केले. त्याचा व्हिडिओ सोशल मीडियावर शेअर करण्यात आला आहे. नोरा फतेही फुटबॉल विश्वचषकाच्या अँथेम सॉन्गमध्ये येत शकीरा आणि जेनिफर लोपेझ यांच्या क्लबमध्ये सामील झाली आहे. दक्षिण आफ्रिकेत २०११ मध्ये झालेल्या विश्वचषकात शकीराने वाका-वाका या गाण्यावर परफॉर्म केले होते. त्याचवेळी, २०१४ मध्ये ब्राझीलमध्ये

## हिंदी गाण्यांवर परफॉर्म करणार?

रिपोर्ट्च्र्या मते, नोरा फतेही हिंदी गाण्यांवर परफॉर्म करणार आहे. तिच्या इंस्टाग्रामवर गाण्याची झलक शेअर करताना नोराने लिहिले, 'यावेळी फिफा वर्ल्ड कपसाठी, 'विविधतेचा स्पर्श असलेले ऑफिशियल विश्वचषक राष्ट्रगीत.' फिफा विश्वचषकाचा उद्घाटन सोहळा रविवारी, २० नोव्हेंबर रोजी भारतात होणार आहे. भारतीय वेळेनुसार रात्री ८:३० वाजल्यापासून उद्घाटन सोहळा सुरू होईल. यामध्ये अनेक कलाकार सहभागी होणार आहेत.

# तब्बल पाच वर्षांनी होणार दिल्लीत कसोटी सामना!

## बॉर्डर-गावसकर ट्रॉफीचे टीम इंडिया भूषवणार यजमानपद

**ॲडलेड।**
**महाईन्यूज । वृत्तसंस्था**

ऑस्ट्रेलिया पुढील वर्षी चार कसोटी सामन्यांच्या मालिकेसाठी भारत दौऱ्यावर येणार आहे. जागतिक कसोटी अजिंक्यपद स्पर्धेच्या दृष्टीने ही मालिका दोन्ही संघांसाठी महत्त्वाची ठरणार आहे. ही मालिका अंतिम फेरीत पोहोचणारा संघ ठरवू शकते. सध्या ऑस्ट्रेलियन संघ ७० गुणांच्या टक्केवारीसह गुणतालिकेत अव्वल स्थानावर आहे. त्याचबरोबर भारतीय संघ ५२.०८ गुणांच्या टक्केवारीसह चौथ्या स्थानावर आहे. दक्षिण आफ्रिका (६०) दुसऱ्या तर श्रीलंका (५३.३३) तिसऱ्या स्थानावर आहे. गुणतालिकेत अव्वल दोन संघ पुढील वर्षी अंतिम सामना खेळतील.



भारत-ऑस्ट्रेलिया मालिका, ज्याला बॉर्डर- गावसकर करंडक म्हणूनही ओळखले जाते, पुढील वर्षी फेब्रुवारी-मार्चमध्ये प्रस्तावित आहे. बीसीसीआयने, तारखा आणि यजमान शहर अद्याप जाहीर केलेले नाही. येत्या काही दिवसांत याबाबत निर्णय होऊ शकतो. मात्र, दिल्लीचे अरुण जेटली स्टेडियम चारपैकी एका कसोटी सामन्याचे आयोजन करू शकते. असे झाल्यास अरुण जेटली स्टेडियम पाच वर्षांनंतर कसोटी सामन्याचे आयोजन करेन. ऑस्ट्रेलिया आणि भारत यांच्यातील ही मालिका चार सामन्यांची असून त्यांतील एक सामना दिल्ली खेळला जाईल. राहिलेले तीन सामने अहमदाबाद, धर्मशाला आणि चेन्नई याठिकाणी खेळले जाण्याची पूर्ण शक्यता सांगितली गेली आहे. आयसीसी जागतिक कसोटी अजिक्यपद स्पर्धेच्या चालू हंगामातील भारताचे हे शेवटचे चार कसोटी सामने असतील. स्पर्धेच्या अंतिम सामन्यात पोहोचण्यासाठी भारताला ही मालिका ४-० अशा अंतराने जिंकवी लागणार आहे. मात्र, रोहित शर्मा याच्या नेतृत्वातील भारतीय संघ कसोटी मालिकेत ऑस्ट्रेलियाला क्लीन स्वीप देईलच याची खूप कमी शक्यता आहे.

बीसीसीआयच्या रोटेशन पॉलिसीनुसार, दिल्लीला एका कसोटी सामन्याचे यजमानपद मिळेल, कारण कोविड दरम्यान येथे एकही सामना खेळला गेला नाही. भारत आणि श्रीलंका यांच्यात डिसेंबर २०१७ मध्ये येथे शेवटचा कसोटी सामना खेळला गेला होता. बीसीसीआयच्या एका अधिकाऱ्याने पीटीआय या वृत्तसंस्थेला सांगितले की, “भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यातील दुसऱ्या कसोटी सामन्याचे आयोजन दिल्ली करू शकते. बैठकीनंतर याबाबत निर्णय घेतला जाईल.”

महाईन्यूज
जाहिरात आणि बातम्यांसाठी संपर्क
9657767000